**<u>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, पुणे यांचे न्यायालयात</u>**
**( न्यायिक अधिकारी संजय आ. देशमुख )**

**दिवाणी अपिल नंबर ४२०/२०१२**

**<u>निशाणी ३८, ४० आणि ४२ वरील एकत्रित आदेश</u>**

१— सदर अर्ज अपिलकार नं.२ ही दिनांक २६/०२/२०१९ रोजी मयत झाली परंतु तिचे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणले नाहीत. त्यामुळे अपिल आपोआप फेटाळलेचा झालेला आदेश रद्द होवून मिळावा व उशीर माफी करण्यात यावी आणि वारस रेकॉर्डवर आणण्यास परवानगी दयावी यासाठी सदर अर्ज केले आहेत. अर्जदारांचे कथन की, अपिलकार नं.२ मयत झाल्यानंतर तिचे वारस अनेक ठिकाणी राहतात. त्यामुळे त्यांची माहिती घेण्यास बराच कालावधी गेला.

२— अपिलकार यांचे कथन की, हेतुपूर्वक उशिर केला नाही तर लॉकडाउन झाला त्यामुळे तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी उशिर माफीबाबत आदेश केले, त्यामुळे उशीर माफी मंजूर करावी. अपिलकारांचे कथन की, वारस रेकॉर्डवर न आणलेस त्यांचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३— नि.४५ ला जाबदार यांनी म्हणणे देवून सदर अर्जांना जोरदार हरकती घेतल्या आहेत. त्यांचे कथन की, अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. दिनांक २६/०२/२०१९ पासून बराच कालावधी गेला तरी वारस रेकॉर्डवर आणले नाहीत. हेतुपूर्वक उशिर केल्याचे दिसून येते. सबब अपिलकार यांनी दिलेला अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४— जाबदारतर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, जेव्हा वारस रेकॉर्डवर आणणेची तसदी अपिलकार यांनी घेतली नाही तेव्हा त्यांना उशिर माफी मागणेचा अधिकार नाही.

५— अपिलकारतर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, अपिलकार यांचा उशीर अंतिम न्यायासाठी माफ करणे उचित होईल. शेवटी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

६— जाबदारतर्फे खालील न्यायनिर्णय देण्यात आले आहेत.

१. **युनियन बॅंक ऑफ इंडिया विरुध्द रामचरण, {१९६४ एआयआर २१५},** यामध्ये ज्यादिवशी मृत्यू झाला त्या दिवसापासून मुदत सुरु होते असे कायदेतत्व आहे.

२. **बीबीजान आणि इतर विरुध्द मुरलीधर आणि इतर {१९९५, एस.सी.सी(१) १८७}** यामध्ये असे कायदेतत्व आले आहे की, मुदतीच्या कायदयाचे आर्टिकल १२० नुसार ९० दिवसाच्या आत वारस रेकॉर्डवर आणले पाहिजेत.

३. **रामस्वरुप विरुध्द मुंन्शी { एआयआर १९६३ सर्वोच्च न्यायालय ५९३}** यामध्ये असे कायदेतत्व पुढे आले आहे की, जर मुदतीत वारस रेकॉर्डवर आणले नाहीत तर पूर्ण अपिल फेटाळण्यात येते.

७— वर नमूद न्यायनिर्णयामधील कायदेतत्वावर कोणाचेही दुमत होणार नाही.

८— सदरचे अपिलातील अपिलकार हे ग्रामीण भागातील अशिक्षीत आहेत. त्यांना कायदयाचे पुरेसे ज्ञान नाही. त्यांचेकडून हेतूपूर्वक वारस रेकॉर्डवर आणणेस उशीर झाला असे झालेले नाही. सदर वाद हा स्थावर

मिळकतीचा असून तो गुणदोषावर निर्णित होणे आवश्यक आहे. या बाबीचा विचार करता सदर अपिलकार यांनी दिलेले सर्व अर्ज अंतिम न्यायासाठी मंजूर करणे योग्य होईल. सबब सदर उशिर माफी अर्ज तसेच अबेटमेंट आदेश रद्द करण्याचा अर्ज अंतिम न्यायासाठी मंजूर करण्यात येत आहे. अपिलकार यांनी रक्कम रुपये ५००/— एवढा खर्च जाबदार यांना दयावा. या अटीवर सदर अर्ज मंजूर केले आहेत.

९— वरील कारणास्तव जाबदेणार यांचे वकीलांचा युक्तिवाद स्विकारण्यात आला नाही. तसेच त्यांनी दाखल केलेले वर नमूद न्यायनिर्णय हे या कामी अपिलकारला उपयोगाचा नाहीत. कारण अंतीम न्यायासाठी अर्ज मंजूर करण्यात येत आहे. शिवाय त्या न्यायनिर्णयामधील वस्तुस्थिती व या केसची वस्तुस्थिती निश्चितच वेगळी आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी ३८, ४० आणि ४२ मंजूर करण्यात येत आहेत.

२. अपिलकार यांनी खर्च रक्कम रुपये ५००/— जाबदेणार यांना दयावेत.

३. अपिलकारांनी तातडीने अपिल मेमो दुरुस्त करुन त्याच्या प्रती दाखल कराव्यात.

दिनांक ०८/०८/२०२२

( संजय आ. देशमुख )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, पुणे